या समवेत:-मंगळवार दिनांक- १८/०६/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/ ३६५ /२०२४
अहमदनगर, दिनांक- २२/०६/२०२४

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,अहमदनगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद,अहमदनगर.

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
क्र.साप्रवि-१/परिषद/०२/२०२२/ ३६९ /२०२४
अहमदनगर दिनांक- १०/०६/२०२४

प्रति,

खाते प्रमुख सर्व
जिल्हा परिषद अहमदनगर

विषय-स्थायी समिती सभा आढावा बैठकीबाबत.

शासन अधिसुचना क्रंमाक ग्रामविकास विभाग बांधकाम भवन मुंबई दिनांक १३ सप्टेंबर २०२२ असाधारण क्रंमाक ९१ नुसार स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणुन प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सध्या नाशिक शिक्षक पदविधर निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागु झालेली आहे.

तरी स्थायी समितीच्या आढावा सभेसाठी दिनांक १८/०६/२०२४ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समिती सभागृहात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.

(राहुल शेळके)
सदस्य सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहमदनगर

स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १८/०६/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. सभेचे कार्यवृत्त

*हजर अधिकारी*

| *अ.क्र.* | *नाव* | *अ.क्र* | *नाव* |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आशिष येरेकर<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.श्री.संभाजी लांगोरे<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती<br>तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.समर्थ शेवाळे<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री मनोज ससे<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री.पी.बी. ध्रुपद<br>प्रभारी कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.संजय शेवाळे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.दिलीप सोनकुसळे<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| ११ | श्री.पाडुरंग गायसमुद्रे<br>जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री.श्रीरंग गडदे<br>प्र.कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री निलेश कानवडे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| १७ | श्री.अशोक कडूस<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री देविदास कोकाटे<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री राजु लाकुडझोडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |

विषय क्रमांक १:- *दि. ०३/ ०६/ २०२४ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे.*

*ठराव क्र. ८४:- दि.०३/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे* व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे. नाशिक शिक्षक पदवीधर निवडणुकीची आचारसंहिता असल्याने स्थायी समिती सभेत कोणतेही ठराव न होता सर्व खातेप्रमुखांचा कामकाजाबाबत आढावा घेण्यात आला. तसेच ग्रामपंचायत नेवासा बु. ता.नेवासा यांनी केलेली कर आकारणी व विदयुत पारेषण कंपनी यांनी सादर केलेली कर आकारणी यामध्ये तफावत असल्याने मा.स्थायी समितीने पारेषण कंपनीस कर आकारणी मान्य नसल्याने याबाबत सुधारीत कर आकारणीचे दर पत्रक घेऊन अपिलाची सुनावणी पुढील स्थायी समितीत घेण्यात येईल.

**विषय क्रंमाक २:-**मौजे घुमरी ता.कर्जत जि.अहमदनगर येथील ग्रामपंचायतीवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( १९५९ चा मुंबई अधिनियम कलम-३) आणि त्या खालील कलम १४५ (१) अन्वये प्रस्ताव सादर करणेबाबत.

गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेकडील दिनांक-०३/०६/२०२४ अन्वये ग्रामपंचायत घुमरी ता.कर्जत जि.अहमदनगर या ग्रामपंचायतीने त्यांच्या उत्पन्नातील १५ टक्के भाग मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च न केल्याने सदर कार्यकारिणी विरोधात ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन आदेश क्रं. ग्रापप्र-१०८९५४/प्र.क्रं/१०५३/२१-दिनांक-१८/११/१९८९ मधील मुद्या ७ अ मध्ये नमुद तरतुदीनुसार ग्रामपंचायत अधिनियम १९५९मधील कलम १४५ (१) नुसार कारवाईचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्यानुसार मौजे घुमरी ता.कर्जत येथील ग्रामपंचायतीमध्ये १५ टक्के खर्च न करणे बाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास आदेश क्रं.ग्रापंत्र /१०८९/५४/प्र.क्र.१०५३/२१-अ/मंत्रालय मुंबई-३२ दिनांक-१८ नोव्हेंबर १९८९ मधील तरतुदीनुसार ग्रापंनी त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करावयाची आहे. मात्र या आदेशाचे पालन पंचायत सदस्य मंडळाने केले नाही .परिणामत सन २०२१-२२ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात १५ टक्के रक्कम खर्च झालेली नाही. यामध्ये सरपंच ,उपसरपंच,व सदस्य मंडळ यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. त्यासाठी सरपंच ,उपसरपंच,व सदस्य यांना पदासाठी अपात्र घोषीत करणेबाबत ग्रामपंचायत घुमरी ता.कर्जत मध्ये उपलब्ध झालेल्या दप्तरानुसार खालील प्रमाणे त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करणे अपेक्षित होते परंतू सदरचा खर्च झालेला नाही सदरचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्ष | ग्रापंचे निव्वळ उत्पन्न | मागासवर्गीयाकरीता उत्पन्नाच्या १५ टक्केकरावयाचा खर्च रक्कम | झालेला खर्च | खर्च न केलेला निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | १५०७९४ | २२६१९ | ० | २२६१९ |
| २ | २०२३-२४ | २२०४५१ | ३३०६७ | ० | ३३०६७ |
| | | | | | ५५६८६ |

त्यानुसार महाराष्ट्र शासन ग्रामविकास आदेश क्रं.ग्रापंत्र /१०८९/५४/प्र.क्र.१०५३/२१-अ/मंत्रालय मुंबई-३२ दिनांक-१८ नोव्हेंबर १९८९ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करावयाची होती तथापि एकुण रू-५५६८६/-रु ग्रामपंचायतीकडे तपासणी दिनांकापर्यंत मागासवर्गीयांचे उन्नती करिता १५ टक्के रक्कम खर्च केलेली नाही. सबब शासन निर्णय दि.१८/११/१९८९ मधील तरतुदीचे पालन न केल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम व त्या खालील कलम १४५ (१) नुसार ग्रामपंचायत घुमरी कार्यकारिणीचे विघटन करणेचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीने शासनाकडे मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत सादर करणेबाबत उचित निर्णयास्तव सादर

**.ठराव क्रंमाक ८५:-** गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेकडील दिनांक-०३/०६/२०२४ अन्वये ग्रामपंचायत घुमरी ता.कर्जत जि.अहमदनगर या ग्रामपंचायतीने त्यांच्या उत्पन्नातील १५ टक्के भाग मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च न केल्याने सदर कार्यकारिणी विरोधात ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन आदेश क्रं. ग्रापप्र-१०८९५४/प्र.क्रं/१०५३/२१-दिनांक-१८/११/१९८९ मधील मुद्दा ७ अ मध्ये नमुद तरतुदीनुसार ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम १४५ (१) नुसार कारवाईचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्यानुसार मौजे घुमरी ता.कर्जत येथील ग्रामपंचायतीमध्ये १५ टक्के खर्च न करणे बाबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास आदेश क्रं.ग्रापंत्र /१०८९/५४/प्र.क्र.१०५३/२१-अ/मंत्रालय मुंबई-३२ दिनांक-१८ नोव्हेंबर १९८९ मधील तरतुदीनुसार ग्रापंनी त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करावयाची आहे. मात्र या आदेशाचे पालन पंचायत सदस्य मंडळाने केले नाही .परिणामत सन २०२१-२२ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात १५ टक्के रक्कम खर्च झालेली नाही. यामध्ये सरपंच ,उपसरपंच,व सदस्य मंडळ यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. त्यासाठी सरपंच ,उपसरपंच,व सदस्य यांना पदासाठी अपात्र घोषीत करणेबाबत ग्रामपंचायत घुमरी ता.कर्जत मध्ये उपलब्ध झालेल्या दप्तरानुसार खालील प्रमाणे त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करणे अपेक्षित होते परंतू सदरचा खर्च झालेला नाही सदरचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्ष | ग्रापंचे निव्वळ उत्पन्न | मागासवर्गीयाकरीता उत्पन्नाच्या १५ टक्केकरावयाचा खर्च रक्कम | झालेला खर्च | खर्च न केलेला निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | १५०७९४ | २२६१९ | ० | २२६१९ |
| २ | २०२३-२४ | २२०४५१ | ३३०६७ | ० | ३३०६७ |
| | | | | | ५५६८६ |

त्यानुसार महाराष्ट्र शासन ग्रामविकास आदेश क्रं.ग्रापंत्र /१०८९/५४/प्र.क्र.१०५३/२१-अ/मंत्रालय मुंबई-३२ दिनांक-१८ नोव्हेंबर १९८९ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च करावयाची होती तथापि एकुण रू-५५६८६/-रु ग्रामपंचायतीकडे तपासणी दिनांकापर्यंत मागासवर्गीयांचे उन्नती करिता १५ टक्के रक्कम खर्च केलेली नाही. सदर प्रस्तावाची स्थायी समितीसमोर छाननी व पडताळणी करण्यात आली. पडताळणीमध्ये गटविकास अधिकारी कर्जत यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार १५ टक्के रक्कम ग्रामपंचायतीने खर्च केलेली नसल्याचे निर्दशनास येत असल्याने ग्रामपंचायतीने ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन आदेश चे उल्लंघन केलेले असल्याने सदर ग्रामपंचायत मौजे घुमरी ता.कर्जत विघटनाचा प्रस्ताव कलम १४५ (१) अन्वये शासनाकडे मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत सादर करण्याच्या ठरावास स्थायी समिती मंजूरी देत आहे.

**सचिव तथा**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)**
**जिल्हा परिषद, अहमदनगर**

**प्रशासक तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**